ORIGINAL ARTICLE ISSN:-2230-7850

Indian Streams Research Journal

*सारांश :*

सक्षमीकरण ही एक बहुआयामी सामाजिक प्रकिया आहे. सक्षमीकरण हे सहभगीत्वाचे आणि निर्णयं निर्धारण प्रक्रियेचे परिणाम स्वरुप आहे. महिला सक्षमीकरणचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे म्हणता येते की महिला सक्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे की स्त्री व पुरुषांच्या मध्ये समान आदराची भावना निर्माण करणे होय. तसेच विशेषतः स्त्रीयांसाठी राजकीय व्यवस्थेकडून समानता, समान हक्क, विविध संधी समानतेने बहाल केल्या जात असतात. विकासाच्या समान संधी, समाज कल्याणाच्या विविध योजना हया जास्तीत जास्त लोकांच्या पर्यंत पोहचविण्यासाठी महिलांचा सहभाग राजकिय व्यवस्थेत असणे गरजेचे आहे. ज्या महिला या सर्व गोष्टींपासून वंचित आहेत,मागासलेल्या आहेत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या आहेत त्यांना राजकिय प्रकियेत सहभागी करुन घेण्यासाठीचे नियोजन होणे आवश्यक असते. त्याचसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिलांचा विकास होण्यासाठी अशा प्रकारच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

# महाराष्ट्रातील सातारा जिल्हयाच्या खंडाळा तालुक्यातील महिला ग्रामपंचायत सदस्यांचा पर्यावरणपुरक कामातील सहभाग

**पांढरबळे सरोज**

राज्यशास्त्र विभाग , श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ. जिल्हा सातारा महाराष्ट्रण



### प्रस्तावना :–

आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगढ, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिसा, राजस्थान, त्रिपुरा आणि उत्तराखंड या राज्यांनी या पुर्वीच 50% आरक्षणाचे तत्व पंचायत राज्यव्यवस्थेत स्वीकारले आहे व त्याची अंमलबजावनी सुरु आहे. 73व्या घटना दुरुस्तीने हे आरक्षण 50% एवढे महिलांना प्राप्त होणे म्हणजेच महिलांना एक विस्तीर्ण, व्यापक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचे काम राज्यव्यवस्थेने केले आहे. ज्यामूळे स्त्रीयांचा विकास व उन्नती अपेक्षित आहे.

महिलांचा राजकिय व्यवस्थेतील सहभाग म्हणजे महिलांच्या अंगी असलेली पात्रता व पुरुषी वर्चस्वाला झुगारुन सर्व गोष्टींचे आव्हान स्वीकारण्याची प्रवृत्ती या गोष्टीला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. महिलांच्या राजकिय व्यवस्थेतील सहभागीत्वामूळे भारताची अर्धी लोकसंख्या जी राजकिय निर्णय निर्धारण प्रकियेपासून दुरावलेली दिसते. ती सर्व लोकसंख्या प्रकियेत सहभागी होऊन राजकिय व्यवस्थेला स्थिरता व सदृढता प्राप्त करुन देणारी ठरेल ही समाजातील पुरुषी वर्चस्वाच्या प्रवृत्तीला आव्हान देउन सामाजिक समता प्रस्तापित करण्याचे एक साधन ठरेल. महिला PRI मध्ये सहभागी झाल्याने महिलांच्या तकरींबददल त्या स्वतः कार्यक्षम सकियपणे पार पाडू शकतील. तसेच आर्थिक व सामाजिक समस्यांतून मार्ग काढतील. त्यातूनच विषमता नष्ट करुन राजकिय प्रशिक्षण व राजकिय प्रवाह योग्य पद्धतीने चालविण्याचे काम करतील. घटनात्मक तरतूदीनूसार महिलांना दोन महत्वाची सामाजिक आवर्तने वा संधी उपलब्ध झालेल्या दिसतात. एक म्हणजे समाजात स्त्रीला जी अपमानास्पद वागणूक दिली जात असेल तर ती नाकारण्याची व दूसरी म्हणजे स्त्रीला योग्य संधी मिळून तिने समाजात स्वतःची वेगळी उंची पोझिशन तयार करण्याची या दोन्ही गोष्टींमूळे महिलांचे समाजातील स्थान उंचावेल व समाजात स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त होईल

अभ्यासावरुन असे लक्षात येते की ब-याच महिला प्रथमतः राजकिय पाउल ठेवतात, पंचायतीच्या निवडणूकीत उभे राहतात, निवडून येतात तेव्हा त्यांना स्वतंत्रपणे निर्णय करु दिले जात नाहीत तर निश्चितपणे त्यांची कुटुंबातील सदस्य, पती हेच कारभार पाहतात व वारंवार दबाव आणताना दिसतात.

महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते की महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज्यव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. त्यातील प्रथम स्तर म्हणजे ग्रामपंचायत होय. द्वितीय स्तर पंचायत समिती व तृतीय स्तर म्हणजे जिल्हा परिषद होय माझा या प्रथम स्तरावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आहे. इथे सर्व लोकांना राजकिय व्यवस्थेच्या प्रक्रियेत सामावण्याची संधी आहे विशेषतः स्त्रीयांना 50% आरक्षणामूळे संधी उपलब्ध झाली आहे

### उद्दीष्ट

महिलांच्या राजकिय व्यवस्थेतील सहभागावर मी प्रकाश टाकते कारण इतक्या वर्षांच्या पुरुष प्रधान व्यवस्थेत आता कुठे महिलांना राजकिय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी 50% आरक्षणामूळे उपलब्ध झाली आहे.

1.ग्रामीण भागातील महिला सामाजिक आर्थिक व राजकियदृष्टया मागासलेल्या आहेत त्यांची सामाजिक आर्थिक व राजकिय परिस्थिती जाणून घेणे.
2.निर्वाचित महिलांची त्यांच्या पदाविषयी भूमीकेविषयी जबाबदारीविषयी आणि निर्णय निर्धारणाविषयी विषयी जागरुकता जाणून घेणे. त्यांनी आपापल्या वार्डात, गावांत निर्वाचित झाल्यानंतर निर्णय निर्धारण प्रकियेच्या माध्यमातून सहभागी होऊन कोणत्या सुधारणा घडवून आणल्या याचा आढावा घेणे तरच मग आपल्याला महिलांना 50% आरक्षण देण्याच्या ,घटनात्मक निर्णयाचे यशापयश पाहता येईल॰मी ज्या 5 ग्रामपंचायतींचा सर्व्हे केला आहे त्या ग्रामपंचायतील महिलांनी पुढील कार्ये अतिशय सक्षमपणे पार पाडली आहेत.

**सातारा जिल्हयातील खंडाळा तालूक्यातील 5 ग्रामपंचायतीच्या सदस्य महिलांनी अपारंपारिक उर्जा क्षेत्रात केलेल्या कार्याचा तपशील (2012-2013)**

| अ नं | ग्रामपंचायत | निवडून आलेले स्त्री सदस्य | अपारंपारिक उर्जा नियमन | प्रत्येक कुटूंबाला पारंपारिक उर्जेची गरज (युनिट/महिना) | प्रत्येक कुटूंबाला अपारंपारिक उर्जा वापरल्याने झालेली उर्जेची बचत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खंडाळा | 06 | सौर उर्जा चूल व सौर दिवे वापरासाठी 10 कुटुंबांना प्रोत्साहित केले | 100 | 50% |
| 2 | पळशी | 09 | गोबरगॅस, सौर दिवे योजना दलित वस्तीमध्ये राबवल्या | 80 | 65% |
| 3 | भादे | 04 | सौर चूल सी. एल. एफ बल्ब वापरासाठी पुढाकार घेतला | 80 | 60% |
| 4 | जवळे | 05 | सौर चूल सी. एल. एफ बल्ब वापरासाठी पुढाकार घेतला | 90 | 65% |
| 5 | लोणी | 05 | सौर दिवा सौर चूल गोबर गॅस योजना राबवली | 90 | 65% |

### निष्कर्ष

सातारा जिल्हयातील खंडाळा तालूक्यातील 5 ग्रामपंचायतीच्या महिला सदस्यांनी अपारंपारिक उर्जा क्षेत्रात भरीव काम केले आहे. ग्रामपंचायत महिलां सदस्यांनी आपआपल्या वार्डामध्ये केलेल्या पर्यावरणपूरक कार्याचे विश्लेषण

या अभ्यासात करण्यात आलेले आहे सातारा जिल्हयाच्या खंडाळा तालूक्यातील 5 ग्रामपंचायत महिला सदस्यांनी अपारंपारीक उर्जा क्षेत्रात केलेल्या कार्याचा तपशील

### *संदर्भ सूची*

1.रिपोर्ट (2002) रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट(RSCD)
2.सौ. प्रतिभा पाटील 2010 स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला आंतरराष्ट्रीय चर्चासत्र टोरेंटो, पान 1-30
3.वांग बील (2011)'सोलार कम्युनिटी' IDEA/CDEA उर्जा/CHP
4.जागतिक उर्जा नियमन (2001) अपारंपारिक उर्जा तकनीक P-221
5.भार्गव बी. एस. 2012 पंचायती राज आणि जनता